# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः15.04.2024** **वारःसोमवार**

---

1. जम्मू काश्मीरमध्ये विकास होत असून विश्वासाची भावनाही वाढत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन,
2. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या संकल्पपत्र या जाहीरनाम्याचं प्रकाशन,
3. भाजप, काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचा प्रचारसभांचा धडाका, आश्वासनं आणि आरोपांच्या फैरी,
4. शेअर बाजारात सलग तिसऱ्या महिन्यात परदेशी संस्थात्मक गुंतवणुकीचा ओघ कायम आणि
5. 20भारतीय नेमबाजांचं पॅरिस ऑलिम्पिकमधलं स्थान निश्चित.

**<u>पंतप्रधान उधमपूर</u>**

गेल्या कित्येक दशकांत पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकीत दहशतवाद, फुटीरतावाद, दगडफेक, सीमेपलिकडून होणारा गोळीबार हे प्रचाराचे मुद्दे ठरले नाहीत, असं भाजपाचे वरीष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते जम्मू काश्मीरमधल्या उधमपूर इथं झालेल्या प्रचारसभेत बोलत होते. यापूर्वी वैष्णोदेवी अथवा अमरनाथ यात्रा सुरक्षित पार पडणं हा चिंतेचा विषय होता. आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. जम्मू काश्मीरमध्ये विकास होत असून विश्वासाची भावनाही वाढते आहे, असं मोदी म्हणाले. जम्मू काश्मीरमध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होतील आणि राज्याचा दर्जाही मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. घराणेशाही जपणारे राजकीय पक्ष विकासाला आणि इथल्या संपन्न वारशालाही विरोध करत आहेत अशी टीका त्यांनी विरोधकांवर केली. राम मंदिर हा कधीच निवडणुकीचा मुद्दा नव्हता, नाही आणि नसेलही. राम मंदिराचा मुद्दा पाचशे वर्ष जुना म्हणजेच भाजपा किंवा निवडणुका अस्तित्वात येण्याच्याही खूप आधीपासूनचा आहे असं मोदी म्हणाले.

**<u>भाजप जाहीरनामा</u>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्याचं प्रकाशन काल नवी दिल्लीच्या पक्ष मुख्यालयात करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा, पक्षाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह, अमित शहा, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. संकल्प पत्र असं या जाहीरनाम्याचं नाव आहे. समान नागरी कायदा, एक देश, एक निवडणूक आणि एकच मतदार यादी यंत्रणा लागू करण्याचं आश्वासन भाजपनं या जाहीरनाम्यात दिलं आहे. पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत पुढची पाच वर्षे मोफत रेशन पुरवणं, तसंच ज्येष्ठ नागरिकांनाही आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आणण्याचाही उल्लेख यात आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

जागतिक पातळीवरची अस्थिरता आणि तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात मजबूत आणि स्थिर सरकार आणण्याची गरज असल्याचं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केलं. भाजपच्या संकल्पपत्र या जाहीरनाम्याच्या प्रकाशनाच्या वेळी ते बोलत होते. कोणत्याही संकटाच्या वेळी त्या त्या ठिकाणी असलेल्या भारतीयांची सुरक्षितता हे आपल्या सरकारचं पहिलं प्राधान्य आहे आणि अशा परिस्थितीत भारतात एक मजबूत आणि स्थिर सरकार असण्याची गरज कित्येक पटींनी वाढते असंही ते म्हणाले. इराणनं इस्रायलवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते.

**अमित शहा सभा**

देशात आरक्षणाची पद्धत कायम राहील आणि आपला पक्ष ती संपवू देणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल दिली. महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारसभेत महाराष्ट्राच्या भंडारा जिल्ह्यातल्या साकोली इथं ते बोलत होते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहा यांनी त्यांना आदरांजली वाहिली. सांस्कृतिक परंपरांचं पुनरुज्जीवन, दहशतवादाला आळा आणि नक्षलवादाचं जवळपास उच्चाटन करण्याच्या दिशेनं भारतीय जनता पक्षानं काम केल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं. भाजप सरकारनं गरीब नागरिक, महिला, तसंच शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावलं, असा दावाही शहा यांनी केला.

**खर्गे**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काल नागपूरच्या गोळीबार चौकातल्या प्रचारसभेत सत्ताधारी भाजपवर हल्ला चढवला. भाजप भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून काँग्रेसवर टीका करतो, पण काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या आणि भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या 23 नेत्यांना पक्षात सामावून घेतो, असा आरोप खर्गे यांनी केला. भाजपनं भारताच्या नागरिकांना खोटी आश्वासनं दिली. सध्या बाजारपेठेत नोकऱ्या, रोजगार उपलब्ध नाहीत, सकल देशांतर्गत उत्पादन घसरत चाललेलं आहे आणि भाजपनं वचन दिल्याप्रमाणे स्विस बँकेतला पैसाही परत आलेला नाही, असं खर्गे म्हणाले.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात मतदान होणाऱ्या मतदारसंघांमधे प्रचार आता शिगेला पोहोचला असून सर्वच राजकीय पक्षांचे वरीष्ठ नेते प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. राजस्थानमधे जयपूर इथं आज भाजपा नेते आणि केंद्रिय मंत्री अमित शहा पथ फेरी काढणार आहेत. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा भरतपूरमध्ये प्रचारफेरी काढणार आहेत तर उपमुख्यमंत्री दिया कुमारी यांच्यासह राज्यातले अन्य मंत्री विविध ठिकाणी प्रचारसभा घेणार आहेत. काँग्रेसचे राज्यातले प्रदेशाध्यक्ष गोविंद दोटसारा सिकर जिल्ह्यात प्रचार करतील. काँग्रेस नेते अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्याही विविध ठिकाणी प्रचारसभा होणार आहेत.

**परदेशी निधी**

भारतीय शेअर बाजारात सलग तिसऱ्या महिन्यात परदेशी संस्थात्मक गुंतवणूकीचा ओघ कायम राहिला आहे. भारतात या संस्थांनी एप्रिल महिन्यात आतापर्यंत 13 हजार 347 कोटी रुपये मूल्याच्या समभागांची खरेदी केल्याचं नॅशनल सिक्युरीटीज डिपॉझिटरी लिमिटेड अर्थात एनएसडीएलच्या आकडेवारीतून दिसून आलं आहे. सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर स्थिर राहण्याचा अंदाज, महागाई नियंत्रणात असणं, राजकीय स्थैर्य आणि रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणातून मिळालेले आर्थिक शिस्तीचे संकेत यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचं भवितव्य उज्ज्वल असल्याचा विश्वास गुंतवणूकदारांमध्ये निर्माण झाला आहे.

**नेपाळभेट**

नेपाळच्या विविध जिल्ह्यांमध्ये आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांना भारतानं काल 35 रुग्णवाहिका आणि 66 स्कूलबसेस भेट म्हणून दिल्या. भारताचे राजदूत नवीन श्रीवास्तव यांनी नेपाळचे अर्थमंत्री बर्षमान पुन यांच्या उपस्थितीत ही भेट नेपाळकडे सुपूर्द केली. या 101 वाहनांपैकी दोन रुग्णवाहिका भूकंपग्रस्त जाजारकोट आणि पश्चिम रुकुम जिल्ह्यात तैनात करण्यात येतील. सन 1994 पासून गेल्या तीन दशकांत स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने एकंदर 1009 रुग्णवाहिका आणि 300 स्कूलबसेस भारतानं नेपाळला दिल्या आहेत.

**अफगाणिस्तान पूर**

अफगाणिस्तानमध्ये गेले तीन दिवस झालेल्या अतीवृष्टीमुळे आलेल्या पुरात 33 जणांचा मृत्यू झाला तर 27 जण जखमी झाले आहेत. पाऊस आणि अचानक आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाल्याची माहिती तिथल्या आपत्ती व्यवस्थापन विभागानं दिली आहे. सुमारे सहाशे घरांची पडझड झाली असून सहाशे किलोमीटर लांबीचे रस्ते उध्वस्त झाले आहेत. याशिवाय दोन हजार एकर शेती पुरात वाहून गेल्याचं वृत्त आहे. अफगाणिस्तानच्या 34 पैकी 20 प्रांतात अतीवृष्टी झाली आहे.

**इंडोनेशिया दरड**

इंडोनेशियाच्या दक्षिण सुलावेसी प्रांतातल्या ताना तोराजा जिल्ह्यात भूस्खलन होऊन किमान 15 जणांचा मृत्यू झाला. अजून दोन जण बेपत्ता असल्याची माहिती स्थानिक प्रशासनानं दिली आहे आणि हे दोघे ढिगाऱ्याखाली अडकले असल्याचा अंदाज आहे. ताना तोरजा जिल्यासह आजूबाजूच्या भागांना गेल्या आठवड्यात जोरदार पावसानं झोडपून काढलं होतं.

**डीआरआय**

महसुली गुप्तचर संचालनालयाने काल नाशिकमधून हत्था जोडी या वनस्पतीचे 781 नग आणि साडेएकोणीस किलो मृदू प्रवाळ जप्त केले. वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत या दोन्ही गोष्टी संरक्षित आहेत. वन्यजीव तस्करांची एक टोळी या वस्तू विकण्यासाठी ग्राहकांचा शोध घेत असल्याची गुप्त माहिती संचालनालयाला मिळाली होती. याआधारे सापळा रचून तस्करांना ताब्यात घेण्यात आलं. त्यानंतर राज्य वन अधिकाऱ्यांकडे त्यांचा ताबा देण्यात आला.

**सणउत्सव**

देशाच्या विविध भागात काल सुगीच्या हंगामातले पारंपरिक सण साजरे करण्यात आले. पंजाबमध्ये वैशाखी, केरळमध्ये विशू, पश्चिम बंगालचा पोयला बैशाख, आसामचा बोहाग बिहू तर तमिळनाडूमध्ये पुथंडू हे सुगीचा हंगाम सुरू झाल्याची वर्दी देणारे सण उत्साहात साजरे झाले. या सणांच्या शुभेच्छा देतानाच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी अन्नदात्या शेतकऱ्यांचे आभार मानले आहेत.

**ऑलिम्पिकनेमबाजी**

आगामी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत आत्तापर्यंत 20 भारतीय नेमबाजांनी आपलं स्थान निश्चित केलं आहे. रिओ दी जानेरो इथं आयसीसीएफ ऑलिम्पिक पात्रता अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या पलक गुलियानं महिलांच्या 10 मीटर एअर पिस्तूल प्रकारात 217 पूर्णांक 6 गुणांसह कांस्यपदक पटकावलं आणि ऑलिम्पिकमधल्या आपल्या प्रवेशावर शिक्कामोर्तब केलं. सैन्यम सुरुची 176 पूर्णांक 7 गुणांसह पाचव्या स्थानी राहिली, पण तिला ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळवता आलं नाही.

**कुस्ती अजिंक्यपद**

किरगिस्तानच्या बिश्केक इथं सुरू असलेल्या वरिष्ठ आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या हर्षिता आणि अंजू पंघल यांनी रौप्यपदकांवर नाव कोरलं. हर्षिताला 72 किलो वजनी गटात चीनच्या क्विआन जिआंग हिच्याकडून 2-5 असा पराभव पत्करावा लागला, तर 53 किलो वजनी गटात अंजूला उत्तर कोरियाच्या प्रतिस्पर्ध्यानं 10-0 नं नमवलं. याशिवाय भारतानं दोन कास्यपदकांचीही कमाई केली. अंतिम पंघलनं 65 वजनी गटात दक्षिण कोरियाच्या सू बिन किमवर मात केली, तर मनिषा भनवाला हिनं 62 किलो वजनी गटात हंगेरीच्या प्रतिस्पर्ध्याला धूळ चारून कांस्यपदकाला गवसणी घातली.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**